# AKHIL AUSTRALIA MARATHI SAMMELAN 2019
# अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन २०१९

MARATHI ASSOCIATION SYDNEY INC. (MASI)

नमस्कार मंडळी !

पुन्हा एकदा आपल्याशी संपर्क साधण्यात आम्हाला अतिशय आनंद होत आहे. आधी कळवल्या प्रमाणे, आपले अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन पुढच्या एप्रिलमध्ये होत आहे. तीन दिवसांच्या ह्या संमेलनात मराठी रसिकांसाठी भारतातील अनेक नामांकित पाहुणे कलाकारांचे तसेच आपल्या स्थानिक कलाकारांचे बरेच आगळे–वेगळे कार्यक्रम आखले आहेत.

हे पत्रक खास ऑस्ट्रेलियातील स्थानिक कलाकारांसाठी...

स्थानिक कलाकारांकडून अनेक उत्कृष्ट समूह गीतं, नृत्य, नाटिका, तसेच एकांकिका अपेक्षित आहेत. विशेषतः ह्या संमेलनात तरुण पिढीला प्राधान्य देण्याचे आमचे कसून प्रयत्न आहेत आणि म्हणूनच त्यांच्याकडून आम्हाला खूप अपेक्षाही आहेत. अर्थातच संमेलनात जास्तीत जास्त कलाकारांना भाग घेता यावा तसेच सादरीकरणाचा दर्जा उत्तम असावा ह्या दृष्टीने सर्व कार्यक्रमांसाठी तसेच सर्व कलाकारांसाठी काही नियम अपरिहार्य करणं गरजेचं आहे. आणि म्हणूनच...

१) संमेलनासाठी तुम्ही विचार करत असलेल्या कार्यक्रमाची रुपरेषा वेळेअगोदर आम्हास पाठवणे अत्यंत गरजेचे आहे. Expression of Interest (EOI) चा form आमच्या web-site वर आहे

२) संपूर्ण कार्यक्रमाचा समतोल राखण्यासाठी सर्वांगाने विचार करूनच संमेलनासाठी कार्यक्रम निवडले जातील. निवडीसाठी .MP4 format मध्ये video क्लिपची ही गरज असेल, तसेच कार्यक्रमाची प्रगती व अंतिम सादरीकरण बघण्यासाठीही video clips मागवल्या जातील. त्या संदर्भात आम्ही आपल्याशी नंतर संपर्क करू.

३) निवड केलेले सर्व कार्यक्रम संमेलन समितेने नेमलेल्या निवड समितिच्या (QA Team) अंतिम होकारानंतरच सादर केले जातील. संमेलनात सादरीकरणाबाबत संमेलन समितीचा निर्णय अंतिम राहील.

४) कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांची संख्या खालील प्रमाणे असेल:

- नृत्य : कमीतकमी ८ (आठ) – जास्तीतजास्त १५ ( पंधरा)
- बाल–नाटिका (वय ८ ते १५ वर्ष) : कमीतकमी ४ (चार) – जास्तीतजास्त ६ (सहा)
- समूहगीत : कमीतकमी ६ (सहा) – जास्तीतजास्त १० (दहा)
- एकांकिका–नाटिका : कमीतकमी ४ (चार ) – जास्तीतजास्त १० (दहा)

५) संमेलनात कार्यक्रमाची जास्तीत जास्त वेळ खालील प्रमाणे असेल:

- नृत्य : ६ (सहा) मिनिटं
- बाल–नाटिका (वय ८ ते १५ वर्ष) : १० (दहा) मिनिटं
- समूहगीत : ५ (पाच) मिनिटं
- एकांकिका–नाटिका : एकांकिका किंवा नाटिकेसाठी एकूण ४० मिनिटांपेक्षा अधिक वेळ दिला जाणार नाही.
  (including setting & stage-clearing)

६) सर्व कार्यक्रम मराठीतच असणं आवश्यक आहे. Bollywood ची हिंदी गाणी / आधारित नृत्य संमेलनात मान्य केली जाणार नाहीत.

७) ज्या कार्यक्रमांमध्ये वैविध्यता आणि नावीन्य असेल अशा कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

८) संमेलनाच्या मुख्य कार्यक्रमात कुठलेही वैयक्तिक सादरीकरण नसेल. परंतु, ऑस्ट्रेलियात असलेल्या कलागुणांचा विचार करता, ह्या संमेलनात तश्या कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी आम्ही एक खास योजना आखली आहे. त्यानुसार, कार्यक्रमाच्या मध्यंतरात हॉलच्या बाहेर असे सादरीकरण शक्य होणार आहे (जास्तीत जास्त १० मिनिटे). अर्थातच ह्यालाही संमेलन समितीची पूर्व – परवानगी घेणे तसेच registration अत्यावश्यक असेल.

९) कुठल्याही कलाकाराला (वादकांव्यतिरिक्त) दोन पेक्षा अधिक कार्याक्रमांमध्ये भाग घेता येणार नाही.

१०) कार्यक्रमात भाग घेणाऱ्या प्रत्येक कलाकाराला संमेलनाचं पूर्ण तिकीट घेणं बंधनकारक आहे. तिकिटाबद्दल चे पत्रक पुढील काही दिवसात सर्वांना मिळेलच.

११) कार्यक्रमाबाबत असलेल्या नियमांमध्ये अपवादात्मक बदल करण्याचा संमेलन समितीस पूर्ण अधिकार असेल.

तर मंडळी, तुम्ही ह्या संमेलनात काय काय करणार आहात ते आम्हाला लगेचच कळवा. EOI - Expression of Interest चा फॉर्म आमच्या web-site वर उपलब्ध आहे. तो कृपया भरून आमच्याकडे लवकरात लवकर पाठवा.

EOI - Expression of Interest चा फॉर्म (LINK)
आमची web-site: www.aams2019.org.au
EOI साठी शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०१८

Notes:

1) Only EOIs meeting the Participation Criteria detailed above will be considered for further selection.
2) Sammelan Committee reserves the full right to choose items from all the submissions. Detailed explanations will not be given for the items not selected for presentation.
3) All selected programs will have to go through final QA assessment done by independent QA team appointed by the Sammelan committee. Video clips may be required for this assessment.

मंडळी, तुमच्या सर्जनशीलतेतून साकारलेल्या कलाकृतींना १५०० रसिकांसमोर सादर करा. संमेलनाचा एक वेगळा अनुभव ऑस्ट्रेलियातील मराठी लोकांना देण्यास आमच्या प्रयत्नांना हातभार लावा. तुमच्या भरघोस प्रतिसादाची आम्ही वाट बघत आहोत.

२०१९ संमेलन समिती